महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## राजपत्रित सुटयांच्या दिवशी 30% सूट

## 15 आणि 16 ऑगस्टला घ्या सवलतीचा लाभ



नागपूर :- महा मेट्रो द्वारे संचालित नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत प्रवाशांना मेट्रो प्रवासासाठी विविध प्रकारच्या सवलती देण्यात येत आहेत. विद्यार्थी, नोकरी व्यावसायिक, विक्रीत काम करणारे व्यावसायिक आणि मेट्रोमध्ये सुटीच्या दिवशी प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह कुटुंबीयांना भाड्यात सवलत देण्यात आली आहे. महा मेट्रोने भाड्यात सवलत देण्यासाठी सर्व वर्गांची विशेष काळजी घेतली आहे.

- **राजपत्रित सुटयांच्या दिवशी 30% सवलत**

दर शनिवार आणि रविवारी महा मेट्रो मेट्रो प्रवाशांसाठी भाड्यात 30 टक्के सवलत महा मेट्रोच्या वतीने देण्यात येत असून या व्यतिरिक्त राजपत्रित सुटयांचा दिवशी देखील 30% सवलत मेट्रो प्रवाश्याना देण्यात येत आहे उल्लेखनीय म्हणजे पुढील आठवड्यात १५ ऑगस्ट (स्वतंत्रता दिवस) आणि १६ ऑगस्ट (पारशी नवीन वर्ष निमित्य) राजपत्रित सुट्या असल्यामुळे जास्तीत जास्ती नागरिकांनी मेट्रो सेवेचा वापर करावा असे आवाहन महा मेट्रोच्या वतीने करण्यात आले आहे.

- **महा कार्डचा वापर वाढला**

महामेट्रोच्या महाकार्डचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. महाकार्डने प्रवास करण्यासाठी सामान्य दिवसांत 10% सवलत दिली जात आहे. अधिकृत सुट्टी आणि शनिवार व रविवार व्यतिरिक्त राजपत्रित सुट्टीच्या दिवशी मेट्रोच्या भाड्यात 30% सवलत देत आहे. त्याचप्रमाणे मेट्रोच्या तिकिटांमध्ये 30 टक्के सवलत दिली जात आहे. संस्थांच्या कागदपत्रांच्या आधारे शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी सवलत दिली जात आहे महत्वपूर्ण म्हणजे नुकतेच ७० हजारपेक्षा अधिक नागरिकांनी महाकार्ड प्राप्त केले आहेत.